नि.दि.मु.नं. १३२ /२०१८
ब्रजेश वि. उपअभियंता व इतर.
निशाणी क्र.१३६.

वादी तर्फे साक्षीदार क्र. ३
मी शपथेवर कथन करतो की,

माझे नाव : दिलीप पुंडलिकराव वानखडे,
वय : ५९ वर्षे व्यवसाय : सेवानिवृत्त, हुद्दा : उप अधिक्षक भूमिअभिलेख
राहणार : अकोट, ता. अकोट, जि. अकोला.

..................

**साक्षीदाराचा सरतपास वादी तर्फे वकील श्री.जी.के.टिकार यांचे मार्फत :**

१. मी दिनांक १०.१२.२०१० ते १४.०२.२०१४ पर्यंत अकोट येथे परीरक्षक भूमापक म्हणुन कार्यरत होतो. आता मला निशाणी १३५ सोबत अ.क्र. १ ला दाखल असलेली फेरफार नोंदवहीची सत्यप्रत दाखविण्यात आली. सदर फेरफार मी घेतला होता. मी त्यान्वये डिस्ट्रीक्ट कांउन्सील अकोला यांचे नाव कायम ठेवुन जिल्हापरीषद, अकोला यांचे नावाची नोंद प्लॉट नं. ४, शीट नं. २० यास घेतली होती. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **निशाणी १३७** देण्यात येते. मी सदर नोंद महाराष्ट्र शासनाच्या परीपत्रकान्वये घेतली होती. त्यान्वये सदर प्लॉटच्या आखीव पत्रीकेत जिल्हा परीषद, अकोला ची नोंद घेण्यात आली होती. आता मला निशाणी १३५ या कागदपत्राच्या यादीसोबत अ.क्र. २ ला दाखल असलेली आखीव पत्रीकेची सत्यप्रत दाखविण्यात आली. त्यावरील नोंद मी वरीष्ठांच्या आदेशान्वये घेतली आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **निशाणी १३८** देण्यात येते.

**२.** त्यानंतर आम्हाला उपविभागीय अधिकारी, अकोट यांचे दिनांक १२.०२.२०१४ रोजीचे पत्र आले होते. त्या पत्रास मी दिनांक ०२.०६.२०१४ रोजी उत्तर दिले आहे. सदर उत्तराची सत्यप्रत निशाणी १३५ या कागदपत्राच्या यादीसोबत अ.क्र. ३ ला दाखल आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **निशाणी १३९** देण्यात येते. तसेच आम्हाला जिल्हाधिकारी, अकोला यांचे दिनांक २३.०१.२०१४ रोजीचे पत्र आले होते. त्या पत्रास मी दिनांक १५.

०७.२०१४ रोजी उत्तर दिले आहे. सदर उत्तराची सत्यप्रत निशाणी १३५ या कागदपत्राच्या यादीसोबत अ.क्र. ४ ला दाखल आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **निशाणी १४०** देण्यात येते.

**सरतपास संपला.**

**उलटतपास प्रतिवादी क्रमांक १ तर्फे वकील श्री.जी.एन.इंगोले यांचे मार्फत :**

**३.** हे म्हणणे खरे आहे की नोंदी घेण्याचे अधिकार हे उपअधिक्षक, भूमिअभिलेख यांना आहे. हे म्हणणे खरे आहे की मी अकोट येथे उपअधिक्षक, भूमिअभिलेख पदावर कार्यरत नव्हतो. हे म्हणणे खरे आहे की मी दिनांक २३. ०१.२०१४ रोजी आखीवपत्रीकेत वादमिळकत जागा ही वेटरनरी डिसपेंन्सरी म्हणजेच पशुवैद्यकिय दवाखान्याच्या ताब्यात होती असे नमुद केले आहे.
प्रश्न — तुम्ही निशाणी १३८ या आखीव पत्रीकेत जिल्हा परीषद, अकोला हे नाव तुम्ही कथन करीत असलेल्या परीपत्रकाच्या आधारे घेतले आहे त्या अगोदर ते नाव दावामिळकतीच्या नोंदी सदरी नमुद नव्हते हे म्हणणे खरे आहे काय ?
उत्तर — होय.

**४.** हे म्हणणे खरे आहे की निशाणी १३९ व निशाणी १४० मध्ये जे पत्रव्यवहार नमुद आहेत ते पत्रव्यवहार हे मी केलेल्या नोंदी बदलविण्याच्या अनुषंगाने केले होते. हे म्हणणे खरे आहे की मी सदर निशाणी १४० या पत्रामध्ये नविन आदेश प्राप्त झाल्यास नोंदी बदलवुन अनुपालन अहवाल सादर करण्यात येईल असे कळविले होते. हे म्हणणे खरे नाही की मी निशाणी १३७ व १३८ मध्ये चुकीची नोंद घेतली आहे व ती नोंद घेण्याचा मला कोणताही अधिकार नव्हता. हे म्हणणे खरे नाही की मी खोटी साक्ष देत आहे.

**प्रतिवादी क्र. १ तर्फे उलटतपास संपला.**

५. **उलटतपास प्रतिवादी क्रमांक ३ व ५ तर्फे सरकारी वकील श्री. अजित देशमुख यांनी वरीलप्रमाणे प्रतिवादी क्र. १ तर्फे घेण्यात आलेला उलटतपास हा प्रतिवादी क्रमांक ३ व ५ तर्फे उलटतपास म्हणुन स्वीकारत असल्याचे सांगितले.**

**६. प्रतिवादी क्र. २ तर्फे उपअभियंता सार्वजनिक बांधकाम श्री सुलताने व प्रतिवादी क्र. ४ कार्यकारी अभियंता तर्फे उपअभियंता श्री.पी.पी.इंगळे यांनी वरीलप्रमाणे प्रतिवादी क्र. १ तर्फे घेण्यात आलेला उलटतपास हा प्रतिवादी क्रमांक २ व ४ तर्फे उलटतपास म्हणुन स्वीकारत असल्याचे सांगितले.**

**उलटतपास संपला.**
**फेरतपास नाही.**

माझे समक्ष/श्रवणोत्तर स्विकृत,

स्वा/—

दि. ०९.०६.२०२५.

( महेश एस. काळे )
**दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, अकोट**